रामानंद नगर पोलीस स्टेशन,
जळगाव. ता.जि.जळगाव.महाराष्ट्र.
दुरध्वनी क्रमांक ०२५७-२२८२८६४

जा.क्र. २९७० /२०२५ जळगाव दि. - ०९/०८/२०२५

# प्रेस नोट

**विषय :-** रामानंद नगर पोलीसांची कामगिरी फायरींग करणारा फरार आरोपी १२ तासात अटक.....

दिनांक ०७ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री घडली. सरला राजदीप सपकाळे यांच्या घरात दिपक लक्ष्मण तरटे (रा. रामेश्वर कॉलनी, जळगाव) या सराईताने गावठी कट्ट्यातून फायर केला. फिर्यादीनुसार रामानंद नगर पोलिसांनी आर्म्स अॅक्ट ३/२५ अंतर्गत गुन्हा दाखल केला.

गुन्ह्यानंतर आरोपी फरार झाला होता. मात्र, मा. पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने तातडीने कारवाई सुरू केली. गोपनीय माहिती व तांत्रिक तपासाच्या आधारे रामेश्वर कॉलनी परिसरात काटेकोर सापळा रचून आरोपीला पकडण्यात यश आले. तपासादरम्यान आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेला १५,००० रुपयांचा सिल्वर रंगाचा गावठी कट्टा जप्त करण्यात आला.

दिपक तरटे हा पोलिसांच्या रडारवर आधीपासूनच होता. त्याच्यावर एमआयडीसी पोलीस ठाण्यात चार गंभीर गुन्हयांची नोंद आहे. सदर आरोपी सराईत गुन्हेगार आहे.

रामानंद नगर पोलीसांनी ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते व उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावीत यांच्या मार्गदर्शनाखाली, तर मा. पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. कारवाईत पोउपनि सचिन रणशेवरे, पोहेका सुधाकर अंभोरे, जितेंद्र राजपूत, जितेंद्र राठोड, सुशील चौधरी, पोना मनोज सुरवाडे, विनोद सूर्यवंशी, योगेश बारी, रेवानंद साळुंखे, अतुल चौधरी, गोविंदा पाटील यांनी सहभाग घेतला होता. पुढील तपास पोउपनि/ सचिन रणशेवरे करीत आहेत.



Sd/-

**(पोलीस निरीक्षक)**
**रामानंद नगर पोस्टे जळगाव.**